**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**

**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय**

उरो रुग्णालय परिसर, तिसरा मजला, औंध, पुणे-४११०२७

सत्यमेव जयते

**उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)**
**तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू**
**महाराष्ट्र राज्य पुणे -१**

संकेतस्थळ: arogya.maharashtra.gov.in
कार्यालय : ०२० - २६०५९९३०
नानोप विभाग: ०२० – २६०५८२९२
ई- मेल:crs_d81@yahoo.com

**आरोग्य सेवा** जा.क्र.आमाजीआ/ कक्ष ८१/ ना.नो.प/ज-मृ. नोंदणी/CRS Advisory/ 4530-4607 /२०२६

दिनांक 20 / ०४ / २०२६

प्रती,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू,
जिल्हा परिषद ..............सर्व

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी,
तथा निबंधक जन्म मृत्यू,
महानगरपालिका सर्व

विषय : केंद्र शासनाच्या dc.crsorgi.gov.in या संगणक प्रणालीचा जन्म मृत्यू घटनांच्या नोंदणीसाठी वापर करतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत...
(Advisory regarding online registration of births & Deaths)

संदर्भ : १) मा. सहसंचालक, भारत सरकार, या कार्यालयाचे पत्र क्र. F.No.1/12/2024-VS-(CRS) दिनांक 13-10-2025
२) या कार्यालयाचे पत्र क्र. आमाजीआ/ कक्ष-८१ / ना.नो.प./ज.-मृ. नोंदणी Advisory/ १३९१९-५८/ २०२५ दिनांक ४-११-२०२५
३) मा. मुख्य निबंधक यांचे पत्र दिनांक ३०-१२-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, मा. महानिबंधक, भारत सरकार, या कार्यालयाने केंद्र शासनाच्या CRS Portal या Online संगणक प्रणालीचा जन्म मृत्यू घटनांच्या नोंदणीसाठी वापर करतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत खलील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

केंद्रशासनाच्या CRS Portal या संगणक प्रणालीमध्ये जन्म मृत्यू व उपजत मृत्यू घटनांची ऑनलाइन नोंदणी करत असतांना निबंधक यांनी वापरत आसलेला User ID, Password तसेच OTP इतर कोणत्याही व्यक्तिसोबत शेअर करू नये. प्रणालीत Login करत असतांना सुरक्षेच्या दृष्टीने वापरला जाणारा पासवर्ड वेळोवेळी बदलण्यात यावा. निबंधक यांनी User ID, Password तसेच

OTP इतरांसोबत शेअर केल्यास अनधिकृत व्यक्तींमार्फत CRS पोर्टल/संकेतस्थळाचा वापर करून फसवणूक होण्याची तसेच बनावट/अवैध जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे वितरित होण्याची शक्यता निर्माण होते त्यानुसार या कार्यालयाने संदर्भिय पत्र २ अन्वये आपणास मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

१. वरिप्रमाणे सूचना देऊनही राज्यातील जिल्हा निबंधक/ निबंधक User ID, Password तसेच OTP ही माहिती अद्यापही इतरांसोबत शेअर करत आहेत. परिणामी इतरांना माहिती शेअर केल्यामुळे काही ठिकाणी बनावट प्रमाणपत्रे वितरित झाल्याच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. त्यामुळे देशात व राज्यात काही ठिकाणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

२. पुनश्च आपणास सुचित करण्यात येते की, कोणत्याही कारणासाठी नोंदणी संबंधित अधिकारी यांनी User ID, Password तसेच OTP ही माहिती इतर कोणत्याही व्यक्तिसोबत शेअर करू नये. जिल्हा निबंधक यांची लॉगिन माहितीच्या गोपनीयतेचा भंग झाल्यास त्याचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात. त्यामुळे जिल्हानिबंधक यांनी सदर सूचनांचा अवलंब करावा व आपल्या कार्यक्षेत्रात अंमलबजावणी करावी.

३. अधिकृत नागरी नोंदणी संगणक प्रणाली CRS Portal संकेतस्थळासारखे दिसणारे बनावट (Phishing) पोर्टल काही अनधिकृत व्यक्तींनी तयार केलेले निदर्शनास आले आहे. अशा फसव्या बनावट (Phishing) संकेतस्थळांच्या माध्यमातून पासवर्ड, क्रेडिट कार्ड क्रमांक यांसारखी संवेदनशील माहिती मिळवून नागरिकांची फसवणूक करण्याचा तसेच बनावट जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे अधिकृत संकेतस्थळाचा URL बूकमार्क सेव करून ठेवण्यापेक्षा **<u>प्रत्येक वेळी website URL keyboard द्वारे टाइप करून CRS पोर्टल मध्ये Login करावे.</u>**

४. पोर्टल/संकेतस्थळाशी संबंधित कोणतीही फसवणूक, संशयास्पद नोंदणी किंवा सुरक्षेचा धोका आढळल्यास त्याबाबत तात्काळ वरिष्ठ कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच त्यासंदर्भात सखोल चौकशी करून कायद्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच कायद्याचे गैरवापर केलेला आढळल्यास प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल करावा.

५. वरील बाबींच्या अनुषंगाने सर्व जिल्हा निबंधक, निबंधक, उपनिबंधक तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल अधिकारी/कर्मचारी व हॉस्पिटल यांनी केंद्रशासनाच्या संगणक प्रणालीत लॉगिन करण्यासाठी वापरत असलेला User ID, Password व OTP कोणत्याही व्यक्तिसोबत शेअर करू नये अशा स्पष्ट सूचना आपल्या स्तरावरून निर्गमित करव्यात. त्याचप्रमाणे सर्व निबंधक यांना CRS पोर्टल/संकेतस्थळ वापरतांना दक्षता घेण्यास सूचना द्याव्यात. तसेच जिल्ह्यातील नोंदणी केंद्र, रुग्णालय स्तरावरील सक्रिय वापरकर्त्यांची Login माहितीची नियमितपणे तपासावी व पडताळणी करून अद्ययावत करणे आवश्यक आहे.

६. सर्व जिल्हा निबंधक आपल्या जिल्ह्यात जन्म मृत्यू नोंदणी प्रणालीच्या अधिकृत CRS Portal संकेतस्थळाची URL बाबतीत सर्व सामान्य जनतेमध्ये प्रसार व जनजागृती करावी.

७. जिल्ह्यातील कोणत्याही निबंधक यांनी User ID, पासवर्ड व OTP इतर व्यक्तींसोबत शेअर केल्यामुळे झालेल्या फसवणुकीच्या घटनांबाबत गावस्तरावरील समिति सभा, पंचायत समिति स्तरावरील बैठक आणि जिल्हा स्तरावर होणाऱ्या समन्वय समिति सभा (DLCC) या बैठकांमध्ये नियमित अजेंडामध्ये समाविष्ट कराव्यात व त्यावर चर्चा करण्यात यावी.

आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व निबंधक जन्म मृत्यू यांना आपल्यास्तरावरुन सर्व सूचना त्वरीत निर्गमित करण्यात याव्यात व अनुपालन अहवाल सादर करावा.

(डॉ. बबीता कमलापूरकर)
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ) तथा
उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सस्नेहः-

उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळे (सर्व)

प्रत माहितीस्तव सविनय सादरः-

१) मा. प्रधान सचिव ,सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा. सहसचिव, भारत सरकार, संचालक, जनगणना निर्देशालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) मा.आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक रा.आ.अ, मुंबई.
४) मा. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
५) मा. संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, पुणे.